## (५) : ओरिसा  राज्य :

ओरिसा राज्य हे भारताच्या पूर्वेस असून अतिशय पुरातन इतिहास आणि आधुनिक इतिहासाचा संगम या राज्यास आहे. यालाच पौराणिक कालात उत्कल वकर्निक राज्य म्हणून ओळखत असत. ओरिसा हातमाग व कलात्मक वस्तुसाठी प्रसिध्द असून निसर्ग सौंदर्याने समृध्द आहे.

### भुवनेश्वर

मार्ग:  सोलापूरहून रेल्वेमार्गे रेल्वे क्र १०१९ मुंबई भुवनेश्वर कोणार्कएक्सप्रेसने जाता येते.

भुवनेश्वर हे ओरिसा राज्याची राजधानी असून मंदिराचे शहर म्हणून ओळखले जाते. या ठिकाणी सर्वात प्रसिध्द व प्राचीन असे लिंगराज मंदिर असून त्याचे शिखर १३२ फूट उंच आहे. अनेक कलाकुसरीने समृध्द आहे.

प्रेक्षणीय स्थळे:  वस्तु संग्रहालय, विधानसभा भवन आणि उत्तुंग इमारती पाहण्यासारख्या आहेत.

### अतिशयक्षेत्र  - खंडगिरी  उदयगिरी

मार्ग:  भुवनेश्वर रेल्वे स्टेशनपासून सडकमार्गे ७ कि.मी अंतरावर आहे. हे क्षेत्र प्राचीन अशा समोरासमोरच्या दोन पहाडामध्ये खंडगिरी व उदयगिरी नावाने विख्यात आहे. भ. महावीराच्या कालापासून इ.स. १० व्या शतकापर्यंत या क्षेत्राचा उत्कर्ष होता.

खंडगिरी:  एका उंच पहाडावर १०० पाय-या चढून पर्वत शिखरावर जाता येते. शिखरावर चार दि.जैन मंदिर आहेत. मंदिराच्या पिछाडीला अनेक गुफ़ांमध्ये अतिप्राचीन अशा तिर्थंकरांच्या मूर्त्या आहेत. मंदिराच्या बाजूला ७ फूट उंच खडगासन स्थित भ. पार्श्वनाथांची मनोज्ञ मूर्ती आहे. उदयगिरी मंदिराच्या पिछाडीस आकाशगंगा, गुप्तगंगा, शामकुंड आणि मुनी

लोकांना ध्यान करण्यासाठी अनेक गुंफ़ा आहे. अल्कापुरी गुंफ़ा, राणी गुंफ़ा, पाताळ गुंफ़ा,हत्ती गुंफ़ा अशा विविध गुंफ़ामध्ये तिर्थंकरांच्या कोरलेल्या प्रतिमा व चिन्ह आहेत. जैन सम्राट खारवेल यांचे ऐतिहासिक महत्व असलेला शिलाखेक उपलब्ध आहे. सम्राट खारवेलच्या राणीने ही अनेक जीनालय व गुंफ़ा आदींचे निर्माण केले होते. जैनांच्या पवित्र अशा णमोकार मंत्राचा उल्लेख प्रथम उदयगिरी गुंफ़ेत सापडतो.

सुविधा: खंडगिरी उदयगिरी पहाडाच्या पायथ्याशी अत्यंत भव्य व सुविधायुक्त धर्मशाळा आहे.

## कोणार्क

मार्ग: भुवनेश्वरवरून ४० कि.मी अंतरावर हे ऐतिहासिक ठिकाण आहे. कोणार्क मंदिर हे राष्ट्रीय वैभवशाली अशी एक भव्य वास्तु आहे. विश्वप्रसिध्द असे सूर्य मंदिर असून १६ दगडी भव्य रथावर सुर्यदेवता विराजमान असल्याचे भव्य शिल्प आहे. हे मंदिर जागतिक किर्तीचे असून युनोस्कोच्या मार्गदर्शनाखालील आहे. या ठिकाणास सतत विदेशी पर्यटक भेट देत असतात.

सुविधा: मध्यम व उत्तम प्रतिचे हॉटेल्स उपलब्ध आहेत.

## जगन्नाथपुरी

मार्ग: भुवनेश्वरपासून ६२ कि.मी अंतरावर समुद्र किना-यावर हे पवित्र क्षेत्र आहे. हिंदुच्या पवित्र अशा चार धामापैकी जगन्नाथपुरी हे एक महत्वपूर्ण आहे.१५१ शक्तीपीठात याची गणना केली जाते. अत्यंत भव्य आणि विशाल अशा दगडी बांधणी कोटामध्ये मंदिर समूह आहे. मुख्य मंदिरास निजमंदिर म्हणतात. मंदिराच्या शिखराची उंची २१४ फूट असून कळसावर निलचक्र सुशोभित दिसते. मुख्य मंदिराच्या दक्षिण द्वाराजवळ एका बंद कपाटात भ. वृषभनाथाची १ फूट उंच असलेली मूर्ती विराजमान आहे. पुजा-यास पैसे देऊन ही मूर्ती पाहता येते. अनेक

लोकांचा असा विश्वास आहे की जगन्नाथाची मूर्ती उत्कलजीन म्हणून सम्राट खारवेलने कलिंग राज्य जिंकल्यावर या मंदिराची निर्मिती केली असावी. प्रत्येक वर्षी ३ रथाची भव्य यात्रा असते. आषाढ शुध्द द्वितीयेस निघत असते. पैकी बलभद्र, श्रीकृष्ण आणि सुभद्रा यांचे रथ असतात. मंदिराच्या भोवताली ओरिसा हातमागवस्त्राचे भव्य दालन आहेत.

सुविधा: अनेक भव्य धर्मशाळा उपलब्ध आहेत.

## कटक

मार्ग: भुवनेश्वरपासून महानदीवरील रेल्वे व सडकमार्गे २० कि.मी हे स्थान आहे. कटक हे ओरिसा प्रांताचे पूर्वीचे राजधानीचे शहर आहे. दि.जैन चंद्रप्रभू मंदिर असून १० व्या शतकातील अतिप्राचीन व मनोज्ञ अशा मूर्त्या मंदिरात आहेत.

सुविधा: चौधरी बाजारामध्ये जैन धर्मशाळा आहे.

## सिध्दक्षेत्र - कोटशिला

जसरथ राजा के सुत कहे, देशक लिंग पाचसी लहे,
कोटशिला मुनि कोटि प्रमाण, वंदन करू जोरि जुग पान.

वरील निर्वाण कांडाच्या श्लोकामध्ये कोटशिला हे क्षेत्र प्राचीन कलिंग व आताच्या ओरिसा प्रांतात स्थित आहे, परंतु पद्मपुराणामध्ये कोटशिला ओरिसा प्रांताच्या खंडगिरी उदयगिरी स्थित व कुमारी पर्वतवर स्थित आहे. वास्तविक कोटशिला सिध्दक्षेत्राचा संपूर्ण इतिहास उपलब्ध नाही. परंतु खंडगिरी गुंफ़ात कोटशिला सिध्दक्षेत्र असल्याचे मानतात.